२००९-२०१०

# महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग



## ९ वा वार्षिक अहवाल

१ एप्रिल २००९ -३१ मार्च २०१०

# महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग

## ९ वा वार्षिक अहवाल

## (एप्रिल, २००९—मार्च, २०१०)

वाय २१८६—१

# अनुक्रमणिका


| | | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| | **प्रस्तावना** | (तीन) |
| १. | परिचय | १ |
| २. | चालू वर्षात निर्णय दिलेली प्रकरणे | ३ |
| ३. | अटक झालेल्या व्यक्तीचे अधिकार आणि शिक्षण | ५ |
| ४. | डी. के बसू उपसमिती | ७ |
| ५. | प्रशासकीय आणि तर्कसंगत समर्थन | ९ |
| ६. | निवडक उदाहरणात्मक प्रकरणे | ११ |

# महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग

९, हजारीमल सोमानी मार्ग, छत्रपती शिवाजी टर्मिनस (व्हीटी) समोर, मुंबई ४०० ००१

दूरध्वनी : २२०३ ४२३३ • फॅक्स : २२०९ १८०४


## प्रस्तावना

महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगाचा हा नववा वार्षिक अहवाल असून तो १ एप्रिल २००९ पासून ते ३१ मार्च २०१० या कालखंडासाठी आहे. मानवी हक्क हे अविभाज्य हक्क असून ते मानवाला तो मनुष्यप्राणी असल्यामुळे जन्मतः प्राप्त होतात. मानवी हक्क हे व्यक्तिच्या जीवन, स्वातंत्र्य आणि प्रतिष्ठेशी निगडीत आहेत. या हक्कांपैकी बहूतांश हक्काची हमी ही भारतीय राज्यघटना घेते आणि त्याची अंमलबजावणी भारतीय न्यायालयांमार्फत होऊ शकते.

जो पर्यंत मानवी हक्क चळवळ ही उच्च वर्गाच्या नियंत्रणाखाली राहील तो पर्यंत ती चळवळ हे एक दुखद असत्य राहील. ही चळवळ पंचतारांकित संस्कृतीचे बाहेर यायला हवी. मानवी हक्क चळवळ ही समाजाच्या खालील स्तरावर न्यायला हवी. आपणांस सामाजिक बांधीलकी, सामाजिक जबाबदारी, गरिबांचे दुःख समजून घेण्याची जाणीव हवी.

मानवी हक्कांची अभिव्यक्ती याला एक विशाल गर्भितार्थ आहे. आणि याचा अर्थ असा की, मानवाचे मूलभूत हक्क जे वंश, धर्म, आणि राष्ट्रीयत्व जरी कोणतेही असले तरीही, मानवी विकास व मानवी स्वातंत्र्याच्या दृष्टीकोनातून आवश्यक आहेत. म्हणूनच मानवी प्रतिष्ठेचा केवळ राष्ट्रीय पातळीवरच नाहीतर आंतरराष्ट्रीय स्तरावर देखील आदर करावयास हवा, ओळख असायला हवी.

आज रोजी आयोगात कार्यरत असलेले मा.अध्यक्ष आणि सदस्य यांनी सप्टेंबर २०१३ मध्ये कार्यभार स्वीकारला, आतापर्यंत २००७-२००८ ते २०१२-१३ पर्यंतचे वार्षिक अहवाल तयार करून तत्कालीन सचिव श्री मफिउल हूसेन यांनी सरकारकडे सादर केले नव्हते, त्याची कारणे त्यांनाच माहिती असू शकतील. नवीन अध्यक्ष आल्यानंतर पूर्वीच्या वर्षाचे प्रलंबित असलेल्या वार्षिक अहवालाचे कार्य प्राधान्यक्रमाने घेवून ते सादर करण्यात येत आहे.

**श्री. भगवंतराव डी. मोरे,**
सदस्य.

**न्यायमुर्ती श्री. एस. आर. बन्नुरमठ,**
अध्यक्ष.

स्थळ - मुंबई,

दिनांक-

## भाग १

**१.१** महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग मानवी हक्क संरक्षणासाठी काम करीत आहे. सार्वजनिक प्राधिकरणाकडून मानवाधिकारांच्या विविध प्रकारच्या उल्लंघनासंबंधीच्या तक्रारी निवारण करण्याचे आयोग प्रयत्न करीत आहे. आयोगाची स्थापना ३१ मार्च,२००१ रोजी मानवी हक्क संरक्षण कायदा, १९९३ नुसार करण्यात आली. आयोगाकडे महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांमधून वैयक्तिकरित्या फॅक्सद्वारे किंवा पोस्टाद्वारे तक्रारी प्राप्त होतात. तेथे वकील नेमणूक करण्याची गरज नाही आणि तक्रारदार आपल्या तक्रारी मराठी, हिंदी किंवा इंग्रजीमध्ये दाखल करू शकतो. तेथे एक अध्यक्ष व दोन सदस्य आहेत. त्यांच्या हाताखाली अधिकारी काम करीत असतात. आयोग मानवी हक्क जागरुकता आणि शिक्षण हे कार्यक्रम संपूर्ण महाराष्ट्रात, कार्यशाळा, चर्चासत्र, परिसंवाद इ. मार्गाने आयोजित करीत असतो. आयोगाने सुरू केलेल्या प्रशिक्षण कार्यक्रम मार्फत जनतेमध्ये मानवी हक्क साक्षरता प्रसार होण्यास मदत झाली आहे.

**१.२** आयोगाने विविध सरकारी तुरुंग, कारागृहे, पोलीस ठाणे इत्यादी ठिकाणी अचानक भेटी देऊन त्यांच्याकामावर वचक ठेवला आहे.

**१.३** मानवी हक्कांच्या जगातील जुन्या आठवर्णींना उजाळा दिल्यास, ही संकल्पना कशी उत्क्रांत पावली हे पाहूया. मानवी हक्कांची कथा ही मानवाचीच आहे. वर्षानुवर्ष माणसाच्या स्वातंत्र्यासाठी संघर्ष होत होता. तो संघर्ष प्रत्येक माणसाच्या मूलभूत हक्कांच्या संरक्षणासाठी होता. इंग्लंडचा राजा किंग जॉन याने अनेक प्राचीन कायदयांचे उल्लंघन करून ज्या काही जुन्या रुढीपरंपरा प्रमाणे देशाचा राज्यकारभार केला जात होता, त्या परंपरा मोडीत काढल्या. अखेरीस त्यांच्या असंतुष्ट झालेल्या प्रजेने त्याला १२१५ मध्ये मॅग्ना कार्टा करारावर सह्या करण्यास भाग पाडले ज्या मध्ये असंख्य हक्कांची यादी दिली होती. १६८९ मध्ये हक्क विधेयकाने मानव हक्कांची संकल्पना स्थापन केली. फ्रेंचच्या राज्यक्रांतीमध्ये साम्राज्य उलथवून टाकले होते आणि प्रजासत्ताकाची स्थापना झाली त्याने जगाला स्वातंत्र्य, समता बंधुता या फ्रेंच संकल्पना दिल्या.

फ्रेंच राज्यक्रांतीने मुनष्याच्या हक्कांचे घोषणापत्र १७८९ मध्ये आणले. अमेरिकन स्वातंत्र्याच्या घोषणापत्राने (अमेरिकेचे हक्काचे विधेयक १७९१) ज्यातून उत्तर अमेरिकेतील ब्रिटिश कॉलनींचे स्वातंत्र्य जाहीर झाले. ते असे सांगितले की ते सत्य स्वयंसिद्ध आहेत अशी आमची धारणा आहे की, सर्व माणसे जन्माला आली तेंव्हा सारखीच होती. निर्मात्याने त्यांना काही अहस्तांतरणीय हक्क दिलेले आहेत. जसे, जीवन, स्वातंत्र्य आणि आनंदाने जीवन जगण्याचा अधिकार.

गुलामगिरी विरुद्ध लढाईत अमेरिकेत गुलामगिरीचा ऱ्हास झाला आणि अतंतः प्रत्येक माणसाचे हक्क त्यांचा वंश विचारात न घेता मान्य केले गेले.

एखादयाने भारतीय स्वातंत्र्य संग्रामाकडे काळजीपूर्वक पाहिल्यास, असे दिसून येईल की, तो मानवी हक्कासाठी लढा होता. बऱ्याच देशांमध्ये क्रांती झालेल्या आहेत. त्यापैकी काही चळवळी ह्या स्वातंत्र्यासाठी होत्या कारण लोकांची दडपशाही आणि त्यांचे शोषण केले जात होते आणि त्यांचे मूलभूत मानवी हक्क पायदळी तुडवले जात होते.

मानवी हक्क हा माणसाला त्याच्या जन्मापासून मिळालेला हक्क आहे. मानवी हक्कात सर्व मूलभूत स्वातंत्र्याचा समावेश होतो. ते मानवाच्या प्रतिष्ठीत जीवन जगण्याच्या मागणीच्या आधारावर आधारित आहेत, जिथे प्रत्येक मनुष्याचा आदर केला जातो. तसेच त्याची काळजी घेतली जाते. हे हक्क मूलभूत आहेत. वास्तविक पाहता मानवाची प्रतिष्ठा साध्य करण्यासाठी तसेच संपूर्ण मानव जातीची जोपासना करण्यासाठी आवश्यक आहेत. मानवी हक्क हे अहस्तांतरणीय, एकमेकांवर अवलंबून असणारे, नैसर्गिक, मूलभूत आहेत.

**१.४** संयुक्त राष्ट्रांनी १९४८ च्या मानवी हक्कांच्या जागतिक जाहिरनाम्यात काही हक्क नमूद केले आहेत आणि असे जाहीर केले की, प्रत्येक मनुष्याला कोणत्याही बाबीत भेदभाव न करता मूलभूत हक्क आहेत. या हक्कांची प्रत्येक राष्ट्रांनी हमी दिली पाहिजे आणि त्याचे संरक्षण केले पाहिजे. त्या हमीनाम्याचे त्यानंतर पुढे १९६६ मध्ये झालेल्या नागरी, राजकीय हक्क आणि आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक हक्क करारात अनुष्ठाण केले गेले. आंतरराष्ट्रीय आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक हक्काचा करार असे सांगतो की, हक्कांना कधीही मर्यादा आणता येणार नाहीत किंवा आणिबाणीच्या परिस्थितीत सुद्धा निलंबित करता येणार नाही. तो करार जीवन जगण्याचा अधिकार, काम मिळण्याचा अधिकार, समान काम समान वेतनाचा अधिकार, अल्पसंख्याकांना त्यांच्या स्वतःच्या संस्कृती, धर्म आणि भाषेप्रमाणे जगण्याचा अधिकार या सर्व हक्कांना ओळखतो, नागरी आणि राजकीय हक्कांचा करार लोकांत कोणत्याही प्रकारचा भेदभाव करण्याच्या पूर्वीच्या शासनाच्या अधिकृत धोरणाचा प्रतिबंध करतो आणि लोकांना त्यांचे सर्व अधिकार त्यांच्यात कोणत्याही प्रकारे वंश, रंग, भाषा, लिंग, धर्म अशा कोणत्याही आधारावर लोकांमध्ये भेदाभेद न करता त्यांचे हक्क उपभोगता येतील याबाबत सांगतो.

**१.५** जर आपण मानवी हक्कांचा जागतिक जाहिरनामा आणि दोन करार यांची भारतीय कायदयांबरोबर तुलना केल्यास आपल्या असे लक्षात येईल की, आपल्या घटनेने सुद्धा या आधी मानवाचे हक्क त्याचे मूलभूत अधिकार म्हणून भाग ३ मध्ये दिलेले आहेत आणि त्या हक्कांच्या संरक्षासाठी यंत्रणा दिलेल्या आहेत.

आपल्या घटनेने सर्व भारतीयांना त्यांच्या सर्व मूलभूत अधिकारांची आणि सर्व मानव एकसमान आहेत अशा समाजाची आणि नागरिक एकसमान आणि स्वतंत्र असल्याची हमी दिली आहे. आपली घटना माणसाची एकसमानता त्याचा कायदयासमोर एकसमान दर्जा कायदयापुढे समानता याबद्दल तरतूद, जीवन जगण्याचा अधिकार, वैयक्तिक स्वातंत्र्य, विचार स्वातंत्र्य, बोलण्याचे स्वातंत्र्य, विश्वास स्वातंत्र्य सांगते. घटनेने याबाबतही तरतूद केली आहे की, एखादा तक्रारदार नागरिक ज्याच्या हक्कांचे उल्लंघन झालेले असले तर अन्यायग्रस्त नागरिक, घटनेच्या कलम ३२ प्रमाणे मा. सर्वोच्च न्यायालय आणि संबंधित राज्याच्या मा. उच्च न्यायालयाकडे कलम २२६ प्रमाणे मानवी हक्कांचे संरक्षण करण्यासाठी जाऊ शकतो.

**१.६** मानवी हक्क आंतरराष्ट्रीय बील, संयुक्त राष्ट्र स्थापन केलेल्या आंतरराष्ट्रीय एखाद्या प्रबंधास आणि जनरल विधानसभा ठराव यांना एक अनौपचारिक नाव दिले जाते. त्यांच्या दोन वैकल्पिक शिष्टाचारासह, मानवाधिकार जागतिक घोषणापत्र (१९६६) आणि आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक अधिकार (१९६६), आंतरराष्ट्रीय करारानुसार बनलेले आहे. सदस्य देशांनी त्या करारावर स्वाक्षऱ्या केल्यानंतर ते दोन करार १९६७ मध्ये अंमलात आणले गेले.

**१.७** सुरुवातीला बिल ऑफ राईटच्या स्वरूपाबाबत वेगवेगळे दृष्टीकोन व्यक्त केले गेले. १९४८ च्या जनरल असेंब्लीमध्ये असे योजिले होते बिल ऑफ राइटमध्ये यु.डी.एच.आर चा समावेश करावा. एक करार आणि अमंलबजावणीचे उपाय या स्वरूपात मसुदा समितीने दोन दस्तऐवज तयार करण्याचे ठरविले. एक घोषणा पत्राच्या स्वरूपात ज्यात सामान्य तत्त्वे किंवा मानवधिकारांचे मानदंड विशद केले जातील आणि दुसऱ्या कराराच्या स्वरूपात ज्यात विशिष्ठ हक्कांची व्याख्या देणे आणि त्याच्या मर्यादा सांगणे या स्वरूपात स्पष्ट करता येईल. त्याप्रमाणे समितीने मानवी हक्क आयोगाकडे जागतिक घोषणापत्र आणि मानवी हक्कांवरील जागतिक करार यांचा मसुदा पाठविला. तिच्या दुसऱ्या सत्रात डिसेंबर १९४७ मध्ये तयार होणाऱ्या दस्तऐवज उपयोगात आणण्याचे ठरविले. एक गट घोषणापत्र, दुसरा गट करार आणि तिसरा गट अंमलबजावणी यासाठी तिन कार्यकारी गटांची स्थापना केली. आयोगाने घोषणापत्राचा सुधारित मसुदा सरकारकडून प्राप्त झालेल्या टिप्पण्या विचारात घेऊन मे/जून १९४८ रोजी तयार केला ते घोषणापत्र आर्थिक सामाजिक मंडळ यांच्यामार्फत पॅरिस येथिल जनरल असेंब्लीकडे सादर केला.

## भाग - २

### आयोगाने हाताळलेल्या तक्रारी

हे आयोगाच्या कार्याचे नववे वर्ष होते व आयोगाने हाताळलेल्या तक्रारीच्या स्वरूपावरुन महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगाच्या कार्याबाबत जनजागृती निर्माण झालेली दिसून येते. त्यामुळे आयोगाकडे तक्रारी घेऊन येणाऱ्या व्यक्तींची संख्या वाढलेली दिसून येते. मागील वर्षाच्या तुलनेने यावर्षी आयोगाकडे आलेल्या तक्रारींच्या संख्येत दरवर्षी हळूहळू आणि स्थिर वाढ झालेली आहे. ही बाब लोकांमध्ये झालेली जागृकता आणि आयोगाने बऱ्याच वर्षापासून केलेले कार्य दर्शविते.

**२.२ सांख्यिकी माहिती :—**

चालू वर्षी अहवाल सन २००९-१० मध्ये आयोगाकडे एकूण ६०३४ तक्रारी प्राप्त झाल्या. खालील तक्त्यामध्ये चालू वर्षात प्राप्त झालेल्या नविन तक्रारी बद्दल तपशील दिसून येत आहे आणि मागील वर्षी २००८-०९ या वर्षात प्रलंबित प्रकरणांची संख्या, या वर्षीच्या एकूण प्रकरणांची संख्या, निकाली निघालेल्या प्रकरणांची संख्या, एकूण प्रलंबित प्रकरणांची संख्या या बाबी स्पष्टपणे दर्शवित आहे.

**प्रकरणांचा सांख्यिकी तक्ता**

| वर्ष | गेल्या वर्षी | नविन प्राप्त | वर्षातील एकूण प्रकरणे | लिमिनी मध्ये संपुष्टात | वर्षात निकालात निघालेले | वर्षाच्या शेवटी प्रलंबित प्रकरणे |
|---|---|---|---|---|---|---|
| २००१-०२ | निरंक | १४५४ | १४५४ | ४१९ | ५३८ | ९१६ |
| २००२-०३ | ९१६ | २१५३ | ३०६९ | १५४८ | १६४५ | १४२४ |
| २००३-०४ | १४२४ | २२२६ | ३६५० | ८९५ | १६८६ | १९६४ |
| २००४-०५ | १९६४ | ३३८४ | ५३४८ | १८०३ | २९६४ | २३८४ |
| २००५-०६ | २३८४ | ५५८५ | ७९६९ | २४६६ | ४००४ | ३९६५ |
| २००६-०७ | ३९६५ | ५६१८ | ९५८३ | ३९४२ | ४६३५ | ४९४८ |
| २००७-०८ | ४९४८ | ६४७३ | ११४२१ | ३५२२ | ५९७४ | ५४४७ |
| २००८-०९ | ५४४७ | ७२०८ | १२६५५ | ५१६१ | ८५६३ | ४०९२ |
| २००९-१० | ४०९२ | ६०३४ | १०१२६ | ४४९८ | ७२२४ | २९०२ |

**२.३ तक्रारीचे स्वरूप :—**

प्राप्त झालेल्या तक्रारींमधून ६०३४ प्रकरणांचा विश्लेषणात्मक अभ्यास करण्यात आला आणि त्यांची खालीलप्रमाणे वर्गानुसार विभागणी करण्यात आली.

**कायद्याप्रमाणे आयोगाने दखल घेतलेली प्रकरणे :—**

१. **पोलीस दलाविरुद्धच्या तक्रारी** : या तक्रारीमध्ये समाविष्ट असलेल्या तक्रारी, पोलीसांकडून अधिकारांचा गैरवापर, गुन्हा नोंद न करणे, खोटया प्रकरणांमध्ये गुंतवणे, गैरकायदेशीर अटक, भ्रष्टाचार इ. प्रकारच्या तक्रारी — १३९३ प्रकरणे.

२. **स्थानिक स्वराज्य संस्थांविरुद्ध** : या वर्गामध्ये ग्राम पंचायती, पंचायत समित्या, जिल्हा परिषदा, महानगरपालिका व नगरपालिका इ. विरुद्धच्या तक्रारींचा समावेश आहे. —— ३३० प्रकरणे.

३. **इतर शासकीय विभागांविरुद्ध** : या वर्गामध्ये गृह विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, सार्वजनिक आरोग्य विभाग,सामाज कल्याण विभाग इ. विरुद्धच्या तक्रारींचा समावेश आहे. —— २६४ प्रकरणे

४. **मागासवर्गीय जाती, जमाती व इतर अल्पसंख्यांक यांच्यावर झालेल्या अन्यायाविरुद्धच्या तक्रारी** : —— ८८ प्रकरणे.

५. **कैद्यांचे मानवी हक्क उल्लंघनासंबंधीच्या तक्रारी** : — १७ प्रकरणे

६. **महिलांवरील हिंसा व अन्याय संबंधी तक्रारी** : —— ५८ प्रकरणे

(शा.म.मु.) वाय २१८६—३ (१,०००—१२-२०१४)

**कायद्याप्रमाणे आयोगाकडून दखल न घेता येणारी प्रकरणे :—**

७. नोकरी प्रकरणासंबंधीच्या तक्रारी . . . . . . . . . . .७५४ प्रकरणे

८. कौटुंबिक वादा संबधीच्या तक्रारी. . . . . . . . . . . . .२८६ प्रकरणे

९. जमिनी संबंधातील तक्रारी . . . . . . . . . . . . . . . . १६७ प्रकरणे

१०. खाजगी व्यक्तीविरुद्ध तक्रारी. . . . . . . . . . . . . . .१३१० प्रकरणे

११. बँकेविरुद्ध तक्रारी . . . . . . . . . . . . . . . . . . . ८८ प्रकरणे

१२. इतर तक्रारी . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .१२७९ प्रकरणे

**२.४ कोठडीतील मृत्यू प्रकरणे :—**

चालू अहवाल वर्षी आयोगाला एकूण २८० कोठडीतील मृत्यू प्रकरणांची माहिती प्राप्त झाली. चालू वर्षी अहवालामध्ये २१ मृत्यू पोलीस कोठडीमध्ये आणि १२६ जेल कोठडीत झाले होते. ८ मृत्यू हे चकमकीत झाले होते आणि २० मृत्यू संबंधीच्या सूचना भिक्षेकरीगृहाच्या होत्या. ८६ मृत्यू हे बालगृहामध्ये, १ महिला सुधारगृहात, १८ मृत्यू हे मतिमंद मुलांच्या विभागात झालेले होते.

**२.५** जेथे प्रकरणांची संख्या होती तेथे आयोगाने त्या प्रकरणांच्या तपासणीची चौकशी करण्याची मागणी आयोगाच्या तपासणी विभागाकडे केली होती. वर्ष २००९-१० मध्ये आयोगाने संदर्भित ६० प्रकरणे तपास करण्यासाठी आयोगाच्या अन्वेषण विभागाकडे पाठविली आणि मागील वर्षाची ९ प्रकरणे प्रलंबित आहेत. त्यापैकी ५७ प्रकरणात तपास पूर्ण करून त्याचा अहवाल सादर केला.

## प्रकरण - ३

## अटक व्यक्तीचे हक्क आणि शिक्षण

**३.१** भारतीय राज्य घटनेच्या अनुच्छेद ३२ अन्वये मा. सर्वोच्च न्यायालयाला असलेल्या कार्यक्षेत्राचा उपयोग करून " परमजीत कौर विरुध्द पंजाब राज्य " प्रकरण १९९९ (a) एस.सी.सी. १३ या प्रकरणात असे सांगितले आहे की, जगातील प्रत्येक मनुष्याला मूलभूत अधिकार आहेत. जगातील विविध खंडात, देशात राहणाऱ्या जाती, रंग, धार्मिकता असलेल्या प्रत्येक मनुष्याला मूलभूत अधिकार आहेत. देश, रंग, धर्म यांच्यामुळे त्यांची विभागणी वेगवेगळया समुहात झालेली असू शकते. तथापि मनुष्यप्राणी म्हणून ते सर्व एकच आहेत आणि त्यांना सारखेच अधिकार आहेत.

**३.२** मा. सर्वोच्च न्यायालयाने पुढे असेही निरीक्षण नोंदविले होते की, राष्ट्रीय मानव अधिकार आयोग ही संस्था संसदेने एका कायद्यांतर्गत, मानवी हक्कांच्या उल्लंघनाचे प्रश्न आणि तक्रार यांचे परिक्षण आणि तपास करणे तसेच ते थांबविण्यात सरकारी नोकरांकडून होणारा निष्काळजीपणा यासाठी अस्तित्वात आणला आहे.

### ३.३ मुंबई मध्यवर्ती कारागृहात कैद्यांसाठी मानवी हक्कासंबंधी एक दिवसाचे चर्चासत्र :—

महाराष्ट्र राज्य, मानवी हक्क आयोग आणि मुंबई मध्यवर्ती कारागृह यांनी संयुक्तपणे कैद्यांसाठी एक दिवसाचे चर्चासत्र तुरुंगाच्या आवारात मानवी हक्क व कैदी यासंबंधी आयोजित केले होते. मा. अध्यक्ष न्यायमूर्ती श्री. क्षितिज व्यास हयांनी कार्यक्रमाचे उद्‌घाटन केले आणि आयोगाचे इतर सदस्य न्यायमूर्ती श्री. व्ही. जी. मुनशी, श्री. टी. सिंगारवेल आणि श्री. सुभाष लाला सोबत सचिव श्री. मफिऊल हुसेन आणि संशोधन अधिकारी डॉ. जयश्री पाटील, कारागृह अधीक्षक श्री. राजेंद्र धामणे, अति. अधीक्षक, श्री. अशोक राणे, तुरुंगाधिकारी संजय कांबळे हे सर्व चर्चासत्रास उपस्थित होते. हे चर्चासत्र कैद्यांसाठी आयोजित केले होते. श्री. राजेंद्र धामणे हयांनी आपल्या भाषणात आयोगाला विशेष धन्यवाद दिले आहेत. कारण त्यांनी प्रथमच तुरुंगातील कैद्यांसाठी मानवी हक्क साक्षरता कार्यक्रम आयोजित केला होता. हा कार्यक्रम तुरुंगाच्या परिसरात साजरा झाला. ह्या प्रसंगी कैद्यांसाठी चित्रकला स्पर्धा आयोजित केली होती आणि विजेत्यांना बक्षिसे देण्यात आली.

मा. सदस्य, श्री. सुभाष लाला यांनी भाषण केले आणि त्यांनी कैद्यांना त्यांच्या मानवी हक्काबद्दल मार्गदर्शन केले. सचिव, श्री. मफिऊल हुसेन यांनी असे सांगितले की, तुरुंगातील कर्मचाऱ्यांना त्यांना आखून दिलेल्या मार्गदर्शनाप्रमाणे त्यांनी जाणे गरजेचे आहे. त्यांनी असेही आश्वासन दिले की, आयोग पूर्वी आणि भविष्यातसूद्धा कारागृहातील कैद्यांच्या सुधारणा आणि विकास करण्यासाठी मार्गदर्शन करेल, त्यामुळे कारागृहातून बाहेर पडल्यानंतर कैदयांना प्रतिष्ठीतपणे आणि आत्मसन्मानाने जीवन जगता येईल. संशोधन अधिकरी डॉ. जयश्री पाटील बोलल्या की, तुरुंग ही फक्त शिक्षेची जागा नसून त्यातून सुधारणाही होऊ शकते. प्रत्येक मानवाच्या बदलाला आणि सुधारणेला वाव आहे अशा प्रकारे आरोपींशी वागतांना, त्याची अंतर्गत चाचणी करताना, त्यांना मार्गदर्शन तत्त्वे सांगताना डॉ. डी. के. बसू यांच्या मार्गदर्शक तत्वाकडे लक्ष देणे बंधनकारक आहे.

मा. अध्यक्ष न्यायमूर्ती क्षितिज व्यास यांनी चर्चासत्राच्या समारोपाच्या भाषणात असे सांगितले की, कैद्यांच्या मूलभूत मानवी अधिकारावर (हक्कांवर) लक्ष ठेवण्यासाठी तुरुंग कायद्यांची अधिक प्रभावीपणे सकारात्मक अंमलबजावणी कैद्यांच्या मानव अधिकारांचे रक्षण करण्यासाठी झाली पाहिजे आणि इतरांना प्रोत्साहित केले की, ज्यावेळी त्यांच्या मानवी हक्कांचे उल्लंघन होईल, त्यावेळी त्यांनी आयोगाकडे यावे, त्यामुळे त्यांना वेळेवर न्याय देता येईल.

### ३.४ महाराष्ट्र राज्य मानवी हक्क दिनदर्शिका प्रकाशन :—

डिसेंबर, २००८ मध्ये महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगाने जानेवारी, २००९ ते डिसेंबर,२००९ चे डि. के. बसू यांची मार्गदर्शक तत्त्वे समाविष्ट असलेली दिनदर्शिका प्रकाशित केली. ज्यावेळी आरोपीला पोलिसांकडून अटक होईल त्यावेळी त्यांचे मानवी हक्कांच्या संरक्षणासाठी मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेली मार्गदर्शक तत्त्वे उपयोगात आणता येतील. दिनदर्शिकांचे उद्‌घाटन पोलीस महासंचालक श्री. ए. एन. रॉय यांनी मा. अध्यक्ष न्यायमूर्ती क्षितिज व्यास आणि इतर सदस्य न्यायमूर्ती श्री. व्ही. जी. मुनशी, श्री. टी. सिंगारवेल आणि श्री. सुभाष लाला यांच्या उपस्थितीत केले. १० डिसेंबर, २००८ हा जागतिक मानवी हक्क दिन म्हणून हा दिवस मार्गदर्शक तत्त्वे चित्र आणि रेखाचित्राचा वापर करुन त्यांच्या माध्यमातून तसेच प्रत्येक महिन्यात वेगवेगळ्या मार्गदर्शक सूचना यासंबंधी माहिती दिली होती. त्या मार्गदर्शक सूचना जाणून घेण्यासाठी आणि अटक झालेल्यांचे अधिकारांची जागरुकता वाढविण्यासाठी सर्वांना मदत होईल या उद्देशाने या दिनदर्शिकेने एक उपयुक्त असे काम केले आहे. आम्हांला विविध कार्यालयांमधून सकारात्मक प्रतिसाद मिळाला.

### ३.५ एच.जे.लॉ कॉलेजला भेट :—

सन २००९ मध्ये सचिव श्री, मफिऊल हुसेन आणि डॉ. जयश्री पाटील हया एच.जे.विधी महाविद्यालयात मानवी हक्कांचे शिक्षण या विषयाचे चर्चासत्र जे राष्ट्रीय मानवी हक्क आयोग यांच्या सहकार्याने आयोजित केले होते, त्यासाठी हजर होते. सचिव, श्री. मफिऊल हुसेन यांनी प्रमुख पाहुणे म्हणून या कार्याक्रमाचे उद्घाटन केले आणि मानवी हक्कांचा वैश्विक जाहिरनामा यावर भाषण दिले. त्यांनी विद्यार्थ्यांना मानवी हक्कांचे विविध पैलू याविषयी ज्ञान दिले. डॉ. जयश्री पाटील यांनी भारतीय घटनेमध्ये मूलभूत अधिकार म्हणून हमी असलेल्या मानवी हक्कांविषयी तसेच आयोगाची जागरुकता याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. दोघांनी मानवी हक्कांसंबंधित परिसंवादामध्ये परस्पर चांगले योगदान दिले. सहभागी विद्यार्थी हे शिक्षण संस्था (बी.एड.) येथील होते.

### ३.६ डोंगरी, मानखुर्द आणि चेंबूर येथील बालगृहांना (चिल्ड्रेन्स होम) भेटी :—

सन २००९ मध्ये महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगाची उच्च स्तरीय समितीचे सचिव, श्री. मफिऊल हुसेन यांच्या नेतृत्वाखाली आणि इतर समाविष्ट असलेले सदस्य पोलीस महानिरीक्षक, श्री.कनकरत्नम, प्रबंधक, श्रीमती नीना खापर्डे, संशोधन अधिकारी, डॉ. जयश्री पाटील आणि अधीक्षक, श्री. जी. रविशंकर हयांनी डोंगरी, मानखुर्द आणि चेंबूर येथील बालगृहांना भेटी दिल्या आणि त्यांची तपासणी केली. मुख्य कार्यपद्धती, प्रशासन आणि उपक्रम पुनरावलोकन केल्यानंतर सदस्यांनी आयोगाकडे एक अहवाल सादर केला. त्या अहवालाची आयोगाने दखल घेतली आहे आणि प्रतिवादी प्राधिकरणाकडून अहवाल मागितला आहे. त्यांच्याकडून अहवाल प्राप्त झाल्यावर, आयोगाने अनेक शिफारशी केल्या होत्या, ज्या बालगृहाच्या कामकाज करताना अंगी बाणल्या पाहिजेत.

### ३.७ धारावी झोपडपट्टी भागात लोकांसाठी जागृती कार्यक्रम :—

महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगाच्या संशोधन अधिकारी श्रीमती डॉ. जयश्री पाटील यांनी झोपडपट्टी भागात लोकांमध्ये जागरुकता निर्माण करण्यासाठी धारावी, मुंबई येथे एक कार्यक्रम प्रशिक्षित विद्यार्थ्यांच्या मदतीने आयोजित केला होता.

कार्यक्रमाचा उद्देश हा होता की, झोपडपट्टीमधील रहिवाशांना मानवी हक्क अधिकारासंबंधी शिक्षण देणे (शिकविणे) आयोगाचे अधिकार आणि त्यांनी त्यांच्या तक्रारी दाखल करण्याची पद्धत सांगणे असा होता.

कार्यक्रमात झोपडपट्टीधारकांना मानवी हक्कांसंदर्भात ज्याबद्दल त्यांना काहीही माहिती नव्हते त्याबाबत त्यांना सविस्तर माहिती देण्यात आली. आयोगाच्या अधिकाऱ्यांनी झोपडपट्टीधारकांनी त्या संदर्भातील केलेली चौकशी, विचारलेले प्रश्न याबाबत उत्तरे दिली आणि जेव्हा ते मानवी हक्कांचे उल्लंघन पाहतील किंवा ज्यांच्या मानवी हक्कांचे उल्लंघन होत असेल त्यांनी त्यावेळेस आयोगाकडे तक्रार दाखल करावी असे सांगून त्यांना प्रोत्साहित केले. पुष्कळवेळा मानवी हक्कांच्या उल्लंघनाबाबत अन्यायग्रस्तास माहिती नसल्यामुळे त्याची चौकशी केली जात नाही. या कार्यक्रमामध्ये झोपडपट्टीधारकांत नवा जोश निर्माण झाला आणि या कार्यक्रमाद्वारे त्यांनी मानवी हक्कांच्या संदर्भातील ज्ञान आत्मसात केले. आणि प्रोत्साहन देऊन त्यांच्या मानवी हक्काचे उल्लंघन झाले असल्यास आयोगाकडे तक्रार करण्याचे मार्गदर्शन केले.

## भाग -४

## डी. के. बसू उप समिती

**४.१** डि.के.बसू या केसमधून उद्‌भवलेल्या फौजदारी याचिका नं.१२७०४/२००१ दि.२५ ऑक्टोबर २००१ रोजी याप्रकरणी मा.सर्वोच्च न्यायालयाने आदेश पारित करून काही निर्देश दिलेले आहेत. त्यात मा. सर्वोच्च न्यायालयाने असे प्रतिपादन केले आहे की, अंमलबजावणी सुनिश्चित करण्याच्या दृष्टीने आता आम्हांला असे वाटते की, या प्रकरणात पुढील देखरेख आणि डी. के. बसू या प्रकरणात सांगितलेल्या ११ आवश्यक मार्गदर्शक बाबी, इतर कायदेशीर सुरक्षेच्या उपायांव्यतिरिक्त यांची अंमलबजावणी तंतोतंतपणे आणि त्यातील भावार्थाप्रमाणे हे काम विविध राज्य सरकारांनी आणि केंद्रशासित प्रदेशात स्थापना केलेल्या मानवी हक्क आयोगाकडे सोपवावे. आता आम्हांला असे वाटते की, या प्रकरणात पुढील देखरेख आणि डि.के.बसू या प्रकरणात सांगितलेल्या ११ आवश्यक बाबींची इतर सुरक्षेच्या उपायांव्यतिरिक्त अंमलबजावणी काटेकोरपणे त्यातील भावार्थाप्रमाणे त्याचे योग्य अनुपालन करणे.

**४.२** सर्वोच्च न्यायालयाने राज्य मानवी हक्क आयोगास देशाच्या दृष्टीने संबंधित आयोगात एक उप समिती स्थापन करण्याचे आदेश दिले आहेत. त्या गरजा पुरविल्या जातात की नाही , याची देखरेख करणे आवश्यक आहे. त्याच्या आवश्यक बाबींची पूर्तता होत आहे की नाही याची खात्री करून घेण्यासाठी पुढील पावले उचलणे आवश्यक आहे.

**४.३** आयोगाच्या बैठकीत नवीन उप समिती स्थान करण्याचा निर्णय घेण्यात आला आणि यात त्यांच्या आवश्यक बाबींची पूर्तता होते की नाही हे व्यवस्थितपणे पाहिले जाते.

**उप समितीतील माननिय सदस्य खालीलप्रमाणे :—**

| | |
|---|---|
| १. न्यायमूर्ती व्ही. जी. मुनशी | अध्यक्ष |
| २. श्री. टी. सिंगारलेल | सदस्य |
| ३. श्री. सुभाष लाला | सदस्य |

उप समितीची पहिली बैठक दिनांक २६ जून २००८ रोजी घेण्यात आली आणि त्यात असे ठरविण्यात आले की चालू वर्षात पोलीस ठाणे, तुरुंग व इतर बंदिस्त ठिकाणी भेटी देण्याबाबत ठरविण्यात आले. तसेच ११ मार्गदर्शक तत्त्वांचे योग्य अनुपालन होते की नाही याकरिता अनेक ठिकाणी भेटी देण्यात आल्या.

उप समिती मा. सदस्यांनी खाली नमूद करण्यात आलेल्या ठिकाणी भेटी दिल्या. आयोगाच्या मार्गदर्शनाने त्रैमासिक अहवाल महाराष्ट्राच्या जिल्ह्यातील पोलीस अधीक्षक कार्यालयांतून आयोगाला प्राप्त झाले. त्यातून मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या ११ मार्गदर्शक तत्त्वाचे अनुपालन होताना दिसून येते.

**४.४ अचानक भेट :**

मा. सर्वोच्च न्यायलयाच्या वरील ११ मार्गदर्शक तत्त्वांच्या योग्य पालनासाठी आयोगाचे मा. अध्यक्ष व आयोगाच्या सदस्यांनी सन २००९-१० मध्ये खालील कस्टोडियल संस्थांना भेटी दिल्या.

| अ.क्र. (१) | पोलीस स्टेशन/ जेल/ कस्टोडियल संस्था (२) | जिल्हा (३) | तारीख (४) | मा. सदस्य (५) |
|---|---|---|---|---|
| १ | जिल्हा स्तरीय तुरुंग | अहमदनगर | १०/८/२००९ | न्या. श्री. क्षितिज व्यास |
| २ | येरवडा खुला तुरुंग | पुणे | १६/५/२००९ | श्री. टी. सिंगारवेल |
| ३ | मध्यवर्ती कारागृह | औरंगाबाद | १३/७/२००९ | न्या. श्री. व्ही. जी. मुनशी |
| ४ | डेक्कन पोलीस स्टेशन | पुणे | १४/७/२००९ | न्या. श्री. व्ही. जी.मुनशी |
| ५ | मध्यवर्ती कारागृह | नाशिक | १६/७/२००९ | न्या. श्री. क्षितिज व्यास |
| ६ | पैठण खुला तुरुंग | औरंगाबाद | १७/७/२००९ | न्या. श्री. क्षितिज व्यास |
| ७ | जिल्हा तुरुंग | अहमदनगर | १०/८/२००९ | न्या. श्री. व्ही. जी. मुनशी |

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| ८ | चतुश्रृंगी पोलीस स्टेशन | पुणे | २७/११/२००९ | श्री. टी.सिंगारवेल |
| ९ | वर्धा जिल्हा तुरुंग | वर्धा | २७/१२/२००९ | न्या. श्री. व्ही. जी. मुनशी |
| १० | मध्यवर्ती कारागृह | पुणे | २९/१२/२००९ | न्या. श्री. व्ही. जी. मुनशी |
| ११ | नांदेड जेल | नांदेड | १६/१/२००९ | श्री. टी. सिंगारवेल |
| १२ | जळगाव जेल | जळगाव | १९/१/२००९ | श्री. टी. सिंगारवेल |
| १३ | मध्यवर्ती कारागृह | नाशिक | २०/२/२०१० | न्या. श्री. व्ही. जी. मुनशी |
| १४ | उप तुरुंग | कोल्हापूर | १४/३/२०१० | न्या. श्री. व्ही. जी. मुनशी |
| १५ | मध्यवर्ती कारागृह | कळंबा | १५/३/२००९ | न्या. श्री. व्ही. जी. मुनशी |

## भाग - ५

## प्रशासकीय काम आणि तर्कसंगत समर्थन

**५.१** मनुष्य हा सामाजिक प्राणी आहे. सामाजिक न्याय आणि मानवी हक्क तत्त्वे यांना एकमेकांबरोबर जावे लागेल कारण प्रत्येक व्यक्तीला मतभेद निरोगी मार्गाने विचारात घ्यावे लागतील आणि प्रासंगिक दृष्टीकोन आणि मतभेद हे टाळले पाहिजे. आणि त्यातील भेदभाव टाळले पाहिजेत. असे सर्व भारतीयांनी केले तर मानवी हक्कांच्या प्रकरणात योग्य हाताळणी करण्यासाठी त्यांना जास्त वाव मिळेल. मानवी हक्क आयोग आधीची जी प्रकरणे आहेत ती कमी करण्यासाठी मदत करील.

**५.२ महाराष्ट्र शासनाच्या शासन निर्णय क्र.एचआरसी/१०९९/३७८/पोल-१४ :—**

दिनांक १५ जानेवारी २००० रोजी महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगाची स्थापना झाली. या आयोगाला ६ मार्च २००१ रोजी सुरूवात होऊन ते १२ मार्च २००१ रोजी कार्यरत झाले. या ठरावात असे सांगितले गेले की, आयोगामध्ये अध्यक्ष व तीन सदस्य असतील आणि याचे मुख्य कार्यालय, मुंबई येथे असेल. न्या. श्री. क्षितिज आर. व्यास हे अध्यक्ष पदावर कायम होते. श्री. सुभाष लाला, श्री. टी. सिंगारवेल आणि न्या. श्री. व्हि. जी. मुनशी हे आयोगाचे ह्या वर्षीचे सदस्य आहेत.

**५.३ कर्मचारी :—**

आयोगाचा कर्मचारी वर्ग वेगवेगळ्या विभागामध्ये काम करतो जसे, प्रशासकीय विभाग, तपास विभाग, कायदेशीर विभाग, संशोधन विभाग, लेखा विभाग, श्री. मफिऊल हुसेन हे सचिव या पदावर कार्यरत आहेत. विशेष पोलीस महानिरीक्षक, श्री. डी.कनकरत्नम हे दि.४ सप्टेंबर २००९ पासून कार्यरत आहेत आणि त्यानंतर दि.४ सप्टेंबर २००९ पासून श्री. के एल. बिश्नोई हे पदावर आहेत. श्रीमती नीना खापर्डे ह्या प्रबंधक पदावर कार्यरत आहेत. डॉ. जयश्री पाटील ह्या संशोधन अधिकारी म्हणून कार्यरत आहेत आणि श्री. जी. रविशंकर हे लेखा विभागामध्ये अधीक्षक म्हणून कार्यरत आहेत. श्री. व्ही. जी. परुळेकर, कक्ष अधिकारी म्हणून, श्री. आर. डी. शिरसाठ, सहायक प्रबंधक पदावर कार्यरत आहेत.

**५.४ परिसर /आवार** : महाराष्ट्र शासनाने शा.नि.क्र.एच.आर.सी.१०९९/ ३७८/पोल-१४, दिनांक १५ जानेवारी २००० द्वारे नमूद केले की, महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगाचे मुख्यालय, मुंबई येथे असेल. त्याप्रमाणे शासनाने कित्येक जागा देऊ केल्या ज्यामध्ये न्यू ॲडमिनिस्ट्रेटीव बिल्डिंग, मंत्रालयासमोर, वरळी गव्हर्नमेंट ट्रान्सपोर्ट सर्व्हिस, अरुण चेंबर्स, ताडदेव, मुंबई, न्यू ॲडमिनिस्ट्रेटीव बिल्डिंग, बांद्रा (पूर्व) व ओल्ड कस्टम हाऊस, मुंबई येथे दिल्या किंवा देऊ केल्या. शेवटी, परिपत्रक क्र.जीए/११.०१/सी.एन.१५/२००१/२२, दिनांक २० जून २००२ प्रमाणे शासनाने २३८० चौरस फुट जागा ॲडमिनिस्ट्रेटीव स्टाफ कॉलेज बिल्डिंग, ९, हजारीमल सोमाणी मार्ग, सी.एस.टी. समोर, मुंबई ४०० ००१ येथे आयोगाला दिली, ती पूर्वी स्टेट फायनान्स आयोगाने व्यापली होती. आयोग त्याच जागेमध्ये कार्य करीत आहे.

**५.५ साधने :**

एप्रिल,२००९ ते मार्च,२०१० या वर्षा दरम्यान राज्य सरकारने अनुदान रुपये ३ करोड ७ लाख २ हजार एवढे उपलब्ध करून दिले. त्यापैकी रुपये २ करोड ३३ लाख ०८ हजार खर्च करण्यात आले आहे.

(शा.म.मु.) वाय २१८६—४ (१,०००—१२-२०१४)

## भाग - ६

**स्पष्टीकरणात्मक प्रकरणे :**

१. **प्रकरण क्र.स्वयंखुद्द ५/२००९-१०**

**प्रतिवाद्याचे नाव** - संचिव, महिला व बाल विकास विभाग,
महाराष्ट्र शासन, मुंबई (३२),
पोलीस आयुक्त, ठाणे.
प्राची कसबेकर, व्यवस्थापकीय विश्वस्त (ठाणे).

**दिनांक** - ८ एप्रिल, २०१०

**गणसंख्या** - विभागीय बेंच
न्यायमूर्ती क्षितिज व्यास -अध्यक्ष
श्री. सुभाष लाला - सदस्य

**तक्रारीचे स्वरूप :**

आयोगाने स्वयंखुद्द दखल घेऊन ठाणे येथील निवास घरात राहणा-या मुलांना होणाऱ्या त्रासाची माहिती करून घेतली. ही बातमी मुंबई मिरर ह्या वर्तमानपत्रात दिनांक २ ऑक्टोबर २००९ व दि. ३ ऑक्टोबर २००९ रोजी ठाणे येथील निवारा घरातील मुले त्रासामुळे रडत आहेत. या मथळ्याअंतर्गत प्रसिद्ध झाली. ज्यामध्ये विश्वस्त आणि धान्य पुरवणाऱ्यांच्या विरोधात गंभीर आरोप होते की, मुख्य गावकऱ्यांच्या अन्न धान्यामध्ये लाल किटक भरलेले होते. त्यानुसार आयोगाने स्वयंखुद्द दखल घेऊन या विषयाची माहिती घेतली.

**आयोगाने केलेली कारवाई :**

या प्रकरणात सुनावणीसाठी संयुक्त व्यासपीठ स्थापन करण्यात आले. या प्रकरणाशी संबंधित असलेल्या सर्वांना नोटीस पाठविण्यात आल्या. आयोगाने वरिष्ठ पोलीस व पोलीस महानिरीक्षक यांना नोटीस पाठविली. तपास विभागाने चौकशी आणि तपास केल्यानंतर आणि सर्व संबंधित साक्षीदारांचे परिक्षण केल्यानंतर त्यांनी त्यांचा अहवाल सादर केला.

**आयोगाचा निर्णय :**

आयोगाने सर्व परिस्थितीचा आढावा घेतला आणि विविध प्रतिवादींच्याकडून प्राप्त झालेल्या अहवालानुसार तसेच आयोगाच्या ज्या तपासणी विभागाकडून अहवाल सादर केला गेला, त्यांचा अहवालाचा नमूद व्यक्तींविरुद्ध या प्रकरणाचा पाठपुरावा करण्याचा हेतू नाही आणि त्यांनी हे प्रकरण श्री. सद्‌गुरु सेवा मंडळाच्या विश्वस्तांवर सोपविले असून ते ज्यांचा कोणत्याही मंचावर (ज्यांना वाटेल त्या) पाठपुरावा (पाठलाग) करतील याचा त्यांना विश्वास आहे. प्रबंधक यांनी हा आदेश संबंधित पक्षकारांना कळवावा.

२. **प्रकरण क्रमांक - ४२६३/०७/०८**

**तक्रारदाऱ्याचे नाव** - जालीस अहमद मोहम्मद नाजिर मोमिन, ठाणे

**प्रतिवाद्याचे नाव** - आयुक्त, ठाणे विभाग

**दिनांक** - २८ फेब्रुवारी २०१०

**गणसंख्या** - न्यायमूर्ती व्ही.जी.मुनशी, सदस्य

**तक्रारीचे स्वरूप** : तक्रारदार हा भिवंडी, जि. ठाणे येथील राहणारा आहे. तो या बाबतीत आयोगापुढे हजर झाला नाही अथवा त्याने त्यांच्या प्रकरणात सिद्धही केले नाही. त्यांनी असे सांगितले की, महानगरपालिकेने त्याच्या परिसरात तीन सार्वजनिक मुताऱ्या बांधल्या आहेत. त्या मुताऱ्यांमधून येणारा बेकायदेशीर कचरा पाणी वाहत आहे. त्यामुळे त्या क्षेत्रातील रहिवाशांना त्याचा उपद्रव झाला आहे कारण घाणेरडा वास आणि भरपूर डास यामुळे सर्व व्यक्ती असमाधानकारक जीवन जगत आहेत. त्यामुळे तक्रारदार या प्रकरणात आयोगाने योग्य ती कारवाई करण्यासाठी आले.

**आयोगाकडून होणारी कारवाई** : या मुताऱ्यांच्या सडलेल्या टाक्या योग्यरित्या दुरुस्त आहेत की नाही हे पाहण्यासाठी प्रतिवाद्याचा महानगर-पालिकेवर एक प्रतिनिधी आहे आणि देखरेख तसेच शौचकूपीतील कचरा, पाण्याचा प्रवाह ड्रेनेजमध्ये जात आहे किंवा नाही हेही त्यास तपासण्यास सांगितले.

**आयोगाचा निर्णय :**

आयोगाला अशी आशा व विश्वास आहे की, प्रतिवादी महामंडळ हे आवश्यक ती सावधगिरी बाळगून त्या क्षेत्रातील रहिवाशांची होणारी गैरसोय/ त्रास दूर करण्याचा प्रयत्न करेल. त्यानुसार या निरीक्षणाद्वारे हे प्रकरण बंद करण्यात आले.

३. **प्रकरण क्रमांक -** ४१५४/०६-०७

**तक्रारदाऱ्याचे नाव -** विकास किसन चौधरी, जि. चंद्रपूर.

**प्रतिवादाचे नाव -** भक्तप्रल्हाद वाघमारे पोलीस अधीक्षक, चंद्रपूर.

**दिनांक -** २७ जानेवारी २०१०.

**गणसंख्या -** न्यायमूर्ती व्ही. जी. मुनशी, सदस्य.

**तक्रारीचे स्वरूप** - तक्रारदार विलास चौधरी हा लोहारा या गावात रहात आहे. तो त्याची बायको व २ मुलांसह वास्तव्य करीत आहे. भक्तप्रल्हाद वाघमारे हे त्याचे शेजारी रहात असून त्यांना भेटण्यासाठी अटी होत्या. तक्रारदाराला असा संशय होता की, भक्तप्रल्हाद वाघमारेने आरोपीवर बलात्कार करून नंतर तिचा खून केला. या प्रकरणी पोलिसांनी कोणतीही योग्य ती कारवाई केलेली नाही. म्हणून तक्रारदार पुढील कारवाईसाठी आयोगाकडे आला आहे.

**आयोगाने केलेली कार्यवाही** : तक्रारदाराने आपल्या दिनांक २५ जानेवारी २०१० रोजीच्या पत्रात आयोगास लिहिले आहे की, प्रतिवादी भक्तप्रल्हाद वाघमारे यांच्या विरोधात पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून त्यांना अटक करण्यात आली आहे. न्यायालयात तपास आरोपपत्र पूर्ण केल्यानंतर हे प्रकरण न्यायालयात सध्या न्यायप्रविष्ट आहे. त्यामुळे पोलिसांनी या प्रकरणात योग्य ती कार्यवाही केली असून कोणताही विरुद्ध शेरा दिलेला नाही.

**आयोगाने दिलेला निर्णय** - तक्रारदाराने आपल्या जबाबात आणि पत्रात असे नमूद केले आहे की, पोलिसांनी केलेल्या कारवाईमुळे तो समाधानी आहे आणि या प्रकरणात तो पुढे जाऊ इच्छित नाही.

म्हणून तक्रारदाराला तक्रारीमध्ये दिलासा मिळाल्यामुळे त्या नुसार त्याने ही केस बंद करण्यास तयारी दर्शविली.

४. **प्रकरण क्रमांक -** ३३१७/२००७-०८.

**तक्रारदाऱ्याचे नाव -** ॲड. के.व्ही. त्रिभुवन

**प्रतिवादाचे नाव -** विकास अभियंता, महानगरपालिका, पुणे.

**ऑर्डर दिनांक -** ११ नोव्हेंबर, २००९.

**उपस्थिती/ गणसंख्या -** न्यायमूर्ती व्ही.जी.मुनशी, सदस्य.

**तक्रारीचे स्वरूप** : तक्रारदार पुणे- वडगाव, मालवाडी येथील रहिवासी आहे. त्यानुसार त्याला वडगाव (मालवाडी ) येथे राहणाऱ्या व्यक्तीला नियमित पाणीपुरवठा मिळत नाही. त्यामुळे तक्रारदाराने प्रतिवादी महानगरपालिकेच्या विरुद्ध पाण्याचा पुरवठा करण्यासाठी कोणतीही सुधारणा नसल्याबाबत तक्रार दिली आहे.

**आयोगाकडून केली गेलेली कारवाई** : प्रतिवादाला नोटीस जारी करण्यात आली आणि त्याचेकडून अहवाल मागविण्यात आला होता. नोटिसीला प्रतिसाद देताना प्रतिवादी कॉर्पोरेशनने अहवाल दाखल केला. अहवाल असे दर्शवितो की, नवीन पाणी पाईपलाईन सक्रीय करण्यात आल्यामुळे आता या भागात राहणाऱ्या व्यक्तींना सुरळीत पाणीपुरवठा मिळत आहे.

**आयोगाचा निर्णय** : तक्रारदाराला नियमितपणे पाणीपुरवठा होत असल्याने त्याच्या समस्येचे निराकरण झाले आहे. त्यामुळे हे प्रकरण कलम १७ (आय)(बी) च्या नुसार मानवी हक्क कायदा, १९९१ च्या संरक्षण कायद्यानुसार बंद करण्यात आले.

५. **डी. के. बसू प्रकरण क्रमांक -** ९६३/२००८-०९.

**केस क्रमांक -** २०११/२००८-०९.

**तक्रारदाऱ्याचे नाव -** ॲड. सुशान कुंजुरामन.

**प्रतिवादाचे नाव -** अधीक्षक, ऑर्थर रोड, जेल, मुंबई.

**ऑर्डर दिनांक -** २८ जुलै २००९.

**उपस्थिती/ गणसंख्या -** न्यायमूर्ती व्ही. जी. मुनशी, सदस्य.

**कामाचे स्वरूप** : तक्रारदार हा मानवी हक्क याचा कार्यकर्ता आहे. त्याने सेंट्रल जेल, ऑर्थर रोड, मुंबई यांच्यावतीने चाचणी कैद्यांच्या अंतर्गत तक्रार केली होती. चाचणी कैद्याच्या केंद्रीय तुरुंग, ऑर्थर रोड, मुंबई येथे त्यांच्या संबंधित पेशीमध्ये उन्हाळी हंगामात गुदमरल्यासारखे झाल्यामुळे त्यांना ताब्यात घेण्यात आले होते आणि त्यांच्यासाठी टेबल फॅन, सिलिंग फॅन नसल्यामुळे अंतर्गत चाचणी कैदी दीनपणे जीवन जगत आहेत. त्यामुळे तक्रारदार सुविधांसाठी विनंती करत आहे.

**आयोगाने केलेली कारवाई** : आयोगाने अधिक्षक, मुंबई सेंट्रल जेल, मुंबई यांचेकडून अहवाल मागविला आणि सुनावणीच्या वेळी उपस्थित रहावे असे सांगितले गेले. मिळालेल्या नोटीसाला अधिक्षक, सेंट्रल जेल, मुंबई यांनी प्रतिसाद देऊन प्रत्युत्तरामध्ये असा उल्लेख केला आहे की, शासनाने पेशी/ बॅरक मधील पंख्यासाठी रु.२,११,९४५ पास केले आहेत आणि त्यानी असे निदर्शनास आणून दिले आहे की, अनुदानाची रक्कम त्यांना अद्यापपर्यंत मिळालेली नाही.

**आयोगाचा निर्णय** : हा विषय अधिक्षकांबरोबर चर्चिला गेला. अधिक्षकांना अशा सूचना दिल्या गेल्या की, शक्यतो लवकरात लवकर अनुदानाची रक्कम मंजूर करून घ्यावी. अपेक्षित अशा लवकरच्या तारखेमध्ये मंजूर करून घ्यावी. त्यामुळे ही केस निकाली काढण्यात आली आहे.

६. **प्रकरण क्रमांक -** ९८७/२००९-१०

**तक्रारदाऱ्याचे नाव -** श्री. विनायक भानुदास जाधव

**प्रतिवाद्याचे नाव -** ए.जी. महाराष्ट्र -१

**ऑर्डर दिनांक -** ९ ऑक्टोबर २००९

**उपस्थिती/ गणसंख्या -** मा. सदस्य, श्री. टी. सिंगारवेल

**तक्रारीचे स्वरूप** : होमगार्ड विभागातील प्रशासकीय अधिकारी म्हणून सेवानिवृत्त झालेल्यांना निवृत्तीनंतरचे फायदे न मिळाल्याबद्दल त्या संबंधित तक्रारदाराची ही तक्रार आहे.

**आयोगाकडून करण्यात आलेली कार्यवाही** : अकाउंटंट जनरल १ मुंबई यांचेकडून अहवाल मागविण्यात आला आणि त्यानी तो अहवाल सादर केला.

**आयोगाचा निर्णय** : आयोगाचा हस्तक्षेपानंतर महालेखापाल यांनी आधीच निवृत्तीनंतरचे लाभ दिले आहेत. त्यामुळे मानवी हक्क संरक्षण कायदा,१९९३ च्या कलम १७ (आय) (बी) अंतर्गत बंद करण्यात आले आहे.

७. **प्रकरण क्रमांक -** ३७८१/२००८-०९

**तक्रारदाऱ्याचे नाव -** रमण रतनजी पटेल

**प्रतिवाद्याचे नाव -** शिधावाटप नियंत्रक, मुंबई

**ऑर्डर दिनांक -** १ एप्रिल २००९

**उपस्थिती/ गणसंख्या -** मा. सदस्य, श्री. टी.सिंगारवेल

**तक्रारीचे स्वरुप** : तक्रारदार हा अंधेरी (प.) येथे गेले ३० वर्ष हमाल म्हणून राहात आहे. तो पश्चिम रेल्वेचा परवानाधारक हमाल आहे. त्याचा बॅच नं.३०२ असून तो सांगतो की, त्याचे रेशन कार्ड सुद्धा आहे.

**आयोगाकडून केली गेलेली कारवाई** : मुंबईच्या शिधावाटप नियंत्रकाकडून अहवाल मागविला गेला. त्यांनी त्यांचा अहवाल दिनांक २३ जानेवारी २००९ रोजी सादर केला. सोबत त्यांनी रेशनकार्डची झेरॉक्स कॉपी नं.३३८५७९ जोडली आहे. आयोगाच्या हस्तक्षेपानंतर तक्रारदाराला त्याचे रेशनकार्ड जारी करण्यात आले.

**आयोगाचा निर्णय** : तक्रारदाराच्या तक्रारीचे निवारण झाले, त्यामुळे हे प्रकरण कलम १७ (आय) (बी) मानवी हक्क संरक्षण कायदा, १९९३ च्या अंतर्गत बंद करण्यात आले.

८. **प्रकरण क्रमांक -** ५७४२/

**तक्रारदाऱ्याचे नाव -** श्री. श्यामराव तुशीरामजी कुरवाळे

प्रतिवाद्याचे नाव - मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद अमरावती

**ऑर्डर दिनांक -** १ जून २०१०

**उपस्थिती/ गणसंख्या -** मा. सदस्य, श्री. टी.सिंगारवेल

**तक्रारीचे स्वरूप** : तक्रारदार श्यामराव तुशीरामजी कुरवाळे ह्यांने सांगितले की, अमरावती जिल्हा परिषद यांनी दारिद्र्य रेषेखालील लोकांच्या यादीमध्ये तक्रारदाराच्या नावाचा समावेश केलेला नाही. तक्रारदाराने असा आरोप केला आहे की, जिल्हा परिषद अमरावती यांनी त्यांच्या मानवी हक्कांचा भंग केलेला आहे. त्यामुळे तक्रारदाराने मानवी हक्क आयोगाशी संपर्क केला.

**आयोगाने केलेली कारवाई** : प्रतिवादी मुख्य कार्यकारी अधिकारी अमरावती, जिल्हा परिषद यांनी आयोगास अहवाल सादर केला आणि तसेच अमरावती जिल्हा परिषद समिती तिवसा यांनी सदर अहवाल मुख्य कार्यकारी अधिकारी, अमरावती यांना पाठविला की, अपिली प्राधिकरण तहसीलदार तिवसा यांनी तक्रारदाराचे नाव दारिद्र्य रेषेखालील लोकांच्या यादीमध्ये समाविष्ट केले.

**आयोगाचा निर्णय** : महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग यांच्या सुचनेमुळे या सर्व परिस्थितीचा आढावा घेतल्यानंतर अमरावती अपिलीय प्राधिकरण, तहसीलदार तिवसा यांनी सर्व परिस्थितीचा आढावा घेतल्यानंतर महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग यांच्या सुचनेमुळे अमरावती अपिलीय प्राधिकरण- तहसीलदार तिवसा यांनी तक्रारदाराचे नाव दारिद्र्य रेषेखालील लोकांच्या यादीमध्ये समाविष्ट केले आहे. आयोगाच्या हस्तक्षेपामुळे आयोगाकडे आलेल्या तक्रारीचे निराकरण होते. त्यामुळे हे प्रकरण कलम १७ (आय)(बी) मानवी हक्क संरक्षण कायदा, १९९३ च्या अंतर्गत बंद करण्यात आले.

९. **प्रकरण क्रमांक -** १००/२००९-१०

**तक्रारदाऱ्याचे नाव -** श्री. संजय टी.के.पाटील
(भ्रष्टाचार विरोधी समिती), ठाणे

**प्रतिवाद्याचे नाव -** १. विशेष पोलीस महानिरीक्षक, कोल्हापूर
२. पोलीस अधीक्षक, कोल्हापूर

**ऑर्डर दिनांक -** १७ नोव्हेंबर २००९

**उपस्थिती/ गणसंख्या -** मा. सदस्य, श्री.सुभाष लाला

**तक्रारीचे स्वरूप** : अर्जदाराने जुनागड राजवाडा पोलीस स्टेशन कोल्हापूर येथील पोलीस अधिकाऱ्यांविरुद्ध तक्रार नोंदविली आहे. तक्रारदाराकडून असे आरोप करण्यात आले आहेत की, पोलीस निरीक्षक यांनी कारच्या पट्ट्या तोडल्या आणि कारमधील लोकांशी गैरवर्तन केले.

**आयोगाने केलेली कारवाई** : त्याचप्रमाणे पोलीस निरीक्षक, श्री. कुरुंदकर यांनी परिस्थिती युक्तीने सांभाळली, विशेषतः जेव्हा त्यांना समजले की, दोन्ही वाहन चालकांना कर्तव्यावर असणाऱ्या पोलीसाने येण्याची परवानगी दिली होती. खरतर ते आणि (वाहनामधील लोक) यांनी परिसर तसेच देवळातील लोकांचे संरक्षण केले त्यामुळे कदाचित पुढील दुष्परिणाम टळले गेले. आणि पोलीस निरीक्षकाविरुद्ध तक्रार नोंदविली गेली.

**आयोगाचा निर्णय** : विशेष पोलीस महानिरीक्षक, कोल्हापूर यांनी या प्रकरणाचा पुनर्तपास विविध अधिकाऱ्यांमार्फत करवून घेतला पाहिजे. ज्यांचा ह्या कोल्हापूर जिल्हा परिसरातील पोलीस दलाशी संबंधीत नाही आणि कायद्यामध्ये असलेली तरतुदीनुसार पुढील कारवाई सदर चौकशीमध्ये जो दोषी ठरलेले आहेत, त्याच्या विरुद्ध कायदा व नियम या मधील तरतुदीनुसार पुढील कारवाई करण्यात यावी. सदर आदेशापासून ६ आठवड्यामध्ये पोलिसांनी आयोगास त्यांनी कोणती कारवाई केली याचा अहवाल द्यावा आणि या शिफारशी बरोबर हे प्रकरण मानवी हक्क संरक्षण कायदा, १९९३ चे कलम १७ (आय)(बी) अंतर्गत बंद करण्यात आले.

१०. **सु- मोटू प्रकरण क्रमांक -** ६/२००९-१०

**तक्रारदाऱ्याचे नाव -** दि इंडियन एक्सप्रेस मुंबई, न्यूजलाईन, नरीमन

**प्रतिवाद्याचे नाव -** १. पोलीस आयुक्त, मुंबई
२. अतिरिक्त पोलीस आयुक्त, मुंबई
३. पोलीस उपायुक्त, झोन-२, मुंबई.
४. एसीपी पायधुनी विभाग,
एल.टी.मार्ग पोलीस स्टेशन, मुंबई.

**आदेश दिनांक -** २२ मार्च २०१०

**गणसंख्या -** मा. सदस्य, श्री. सुभाष लाला

**तक्रारीचे स्वरुप** : दि. २० नोव्हेंबर २००९ रोजी "इंडियन एक्सप्रेस" या वृत्तपत्रात बातमीनुसार मुंबई पोलीस दलाच्या म्हणण्यानुसार "साखळी चोरांची केलेली परेड ही मानवी हक्कांचे उल्लंघन नाही" या बातमीवर आयोगाने स्वयंखुद्द दखल घेतली. यासंदर्भात पोलीस उपायुक्त परिमंडळ - २ मुंबई यांना सत्यप्रतिज्ञापत्र दाखल करण्यासाठी आयोगासमोर बोलाविण्यात आले आणि ते आयोगासमोर हजर झाले.

**आयोगाने केलेली कारवाई** : पोलीस आयुक्त, मुंबई यांचेकडून मागविण्यात आलेल्या अहवालानुसार त्यांनी कायद्याच्या तरतुदीनुसार कोणती योग्य कारवाई किंवा नियमाप्रमाणे केलेल्या आहेत हे सादर करावे किंवा कोणती कारवाई केली किंवा त्याचे नियोजन केलेले आहे याचा अहवाल सादर करावा. त्यानुसार कारवाई केल्याचा अहवाल पोलीस आयुक्त, मुंबई यांचेकडून त्याच्या पत्र क्र.७७१/१० दि. २२ जानेवारी २०१० द्वारे मिळाला.

**आयोगाचा निर्णय** : सुनावणीच्या काळात दाखल केलेल्या कागद पत्रानुसार आणि सामाजिक अहवालानुसार असे दिसून आले की, पोलीस आयुक्त, मुंबई यांनी मिळालेल्या माहितीची घटनेची गंभीरपणे दखल घेतली असून त्यांनी वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांनी मानवी हक्काचे उल्लंघन केल्याबद्दल त्याच्याविषयी आयोगाने नाराजी व्यक्त केली. पोलीस आयुक्त, मुंबई हे प्रकरण आगोदरच गांभिर्याने पाहिले होते आणि त्याबद्दलची नोंद त्या संबंधित पोलीस अधिकाऱ्याच्या सेवापुस्तकात करण्यात आली. अहवाल मान्य केल्यावर हे प्रकरण कलम १७ (आय)(बी) नुसार मानवी हक्क संरक्षण कायदा, १९९३ च्या अंतर्गत बंद करण्यात आले.

**शासनाकडून नाकारण्यात आलेल्या शिफारसी :—**

१. **सु- मोटू प्रकरण क्र. -** ६/२००३ च्या सोबत प्रकरण क्र.१५७६/२००३ आणि प्रकरण क्रमांक- १७३२/२००३

**तक्रारदाऱ्याचे नाव -** शैलेश ठाकूर आणि इतर

**प्रतिवाद्याचे नाव -** १. एसी.एस. गृह विभाग
२. पोलीस अधीक्षक, यवतमाळ

**आदेश दिनांक -** २९ जून २००९

**उपस्थिती/ गणसंख्या -** संयुक्त न्यायपीठ
न्यायमूर्ती क्षितिज व्यास (अध्यक्ष) आणि
श्री. सुभाष लाला, (सदस्य)

**तक्रारीचे स्वरुप** : पोलीस अधीक्षक, यवतमाळ यांच्या कार्यालयात तपासणी दरम्यान श्री. सुरेश सोनकुसरे आणि श्री. अजय मोहिते यांचा मृत्यू झाला त्यास पोलीस अधिकारी जबाबदार आहेत असे तक्रारदाराने पोलिसांविरुद्धच्या तक्रारीत म्हटले आहे.

**आयोगाकडून करण्यात आलेली कारवाई शिफारशीनुसार** : आयोगाला दि. २५ जानेवारी २०११ रोजी पत्र प्राप्त झाले ज्यात कारवाई केल्याचा अहवाल दि. २ सप्टेंबर २००९ रोजी गृह विभाग, मंत्रालय यांचेकडून देण्यात आला. अहवालात असे नमूद केले गेले की, संबंधित पोलीस निरीक्षक व २ शिपाई यांचेवर आवश्यक ती कारवाई करण्यात आली आहे. पोलीस प्रशासनाला श्री. अमितेश कुमार, पोलीस अधीक्षक आणि श्री. तोतावर, पोलीस उप अधीक्षक, यवतमाळ यांचेविरुद्ध कारवाई करण्यासाठी कोणतेही कारण सापडले नाही. म्हणून या दोघांविरुद्ध कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही.

२. **सुमोटू प्रकरण क्रमांक -** २२४८/२००९-१०

**तक्रारदाऱ्याचे नाव -** निलेश ओझा

**प्रतिवाद्याचे नाव -** १. कलेक्टर वर्धा
२. जिल्हादंडाधिकारी, वर्धा
३. पोलीस अधीक्षक, वर्धा

**ऑर्डर दिनांक -** ९ मार्च, २०१०

**उपस्थिती/ गणसंख्या -** संयुक्त न्यायपीठ
न्यायमूर्ती क्षितिज व्यास (अध्यक्ष) आणि
श्री.सुभाष लाला (सदस्य)

**तक्रारीचे स्वरूप** : श्री. शंकर घुमे याचा वर्धा पोलीस स्टेशनमध्ये मृत्यू झाला आहे अशी तक्रार तक्रारदाराने केली असून त्यासाठी पोलीस अधिकारी जबाबदार आहेत असे पोलीसांविरुद्ध त्याने तक्रारीत नमूद केले आहे.

**आयोगाने केलेली कारवाई** : आयोगाने श्रीमती अस्वाती डोरजे, पोलीस अधीक्षक, वर्धा, श्री. दिलीप कारंडे, नायब तहसीलदार, वर्धा आणि श्री. व्ही. डी. भोईरे, तुरुंग अधीक्षक यांचेविरुद्ध विभागीय चौकशी करण्यासाठी शिफारस केली आहे. ही चौकशी श्री. शंकर घुमे यांच्या मृत्युसंबंधी आहे.

**शिफारशीवर शासनाने केलेली कारवाई** : आयोगाला दि.१६/३/२०११ रोजी प्राप्त झालेल्या पत्राबरोबर जिल्हाधिकारी, वर्धा यांच्याकडून दि. ८ ऑक्टोबर २०११ रोजी अहवालाची प्रत मिळाली. ज्यामध्ये श्री. दिलीप कारंडे, नायब तहसीलदार यांना श्री. शंकर घुमे यांच्या मृत्युला जबाबदार धरण्यात आले आहे. आयोगाला गृह विभागाकडून सुद्धा दि. ७ फेब्रुवारी २०११ रोजी प्राप्त झालेल्या पत्रात त्यांनी असे नमूद केले आहे की, पोलीस महासंचालक यांच्या अहवालानुसार श्रीमती अस्वाती डोरजे, पोलीस अधीक्षक, वर्धा यांचा यामध्ये कोणताही दोष नाही. त्यामुळे आयोगाने त्यांच्या विरुद्ध विभागीय चौकशी करण्याचा दिलेला आदेश हा मान्य करण्यात येऊ नये. श्री. व्ही. डी. भोईरे, तुरुंग अधीक्षक, वर्धा यांचे संबंधी पोलीस महानिरीक्षक तुरुंग, पुणे यांचेकडून दि. २६ डिसेंबर २०१२ रोजी आयोगाला प्राप्त झालेल्या पत्रात त्यांनी असे नमूद केले आहे की, चौकशी केल्यानंतर श्री. व्ही. डी. भोईरे, तुरुंग अधीक्षक, वर्धा यांचा काहीही दोष नाही असे आढळून आले.